LiFE
Lifestyle for Environment

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी : ०२२-२२८५५०८२ Email : envmantra-mh@nic.in

---

क्रमांक :- याचिका-२०२२/प्र. क्र.०३/तां. क.३ दिनांक:- २१/०३/२०२५

प्रति,

१. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, गोंदिया.
२. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, भंडारा.
३. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, नागपूर.

**विषय** : सारस क्रेन पक्षी आढळणाऱ्या परिसरातील पाणथळ जागांच्या ब्रीफ डॉक्युमेंट बाबत...

**संदर्भ**: १. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल जनहित याचिका क्र. ०२/२०२१ या प्रकरणी मा.न्यायालयाचे आदेश दि.२७/०१/२०२२, दि.१७/०२/२०२५ व दि.०३/०३/२०२५.
२. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/प्र. क्र.१८/तां.क.३, दि.२२/०६/२०२३.
३. नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट, चेन्नई यांचे पत्र, दि. ०४/०३/२०२५.

महोदय / महोदया,

सारस क्रेन पक्षी आढळणाऱ्या पूर्व विदर्भातून सदर पक्षांची कमी होत असलेली संख्या व त्यांच्या अधिवासाला असलेल्या धोक्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये स्वाधिकारे जनहित याचिका क्र. २/२०२१ दाखल करण्यात आली आहे. त्यामध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्य वेटलँड प्राधिकारणामार्फत वेळोवेळी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आली आहेत.

२. राज्यातील पाणथळ जागा (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ नुसार राज्यातील पाणथळ क्षेत्र अधिसूचित करण्याच्या अनुषंगाने नकाशे तसेच ब्रीफ डॉक्यूमेंट तयार करण्यासाठी National Centre for sustainable Coastal Management (NCSCM) या संस्थेबरोबर राज्य शासनामार्फत करार करण्यात आला असून सदर संस्थेमार्फत राज्यातील प्रस्तावित पाणथळ जागांच्या सर्वेक्षणाबाबतची कार्यवाही सुरू आहे.

३. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार सारस क्रेन पक्षी असलेल्या परिसरातील पाणथळ जागांचे प्राधान्याने सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून उक्त संस्थेकडून गोंदिया जिल्ह्यातील ४३, भंडारा जिल्ह्यातील ३१, चंद्रपूर जिल्ह्यातील ४६ व नागपूर जिल्ह्यातील ७१ असे एकूण १९१ प्रस्तावित पाणथळ जागांचे ब्रीफ डॉक्युमेंट NCSCM कडून राज्य वेटलँड प्राधिकरणास प्राप्त झाले आहेत.

४. राज्य वेटलँड प्राधिकरणामार्फत मा. न्यायालयाकडे दि. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये ब्रीफ डॉक्युमेंट तयार करण्याबाबत पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे-

| अ.क्र. | कार्यवाही | अपेक्षित कालावधी |
|---|---|---|
| १. | राज्य वेटलँड प्राधिकरणाकडे प्राप्त झालेले ब्रीफ डॉक्युमेंट हे संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती यांना त्यांच्या अभिप्रायाकरिता पाठविणे. | ०७ दिवस |
| २. | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती यांचेकडे ब्रीफ डॉक्यूमेंट प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करून विहित केलेल्या विवरणपत्रानुसार सदर जागा या वेटलँड आहेत किंवा कसे या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह राज्य वेटलँड प्राधिकरणास सादर करणे. | ३० दिवस |

५. तरी, संबंधित जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती यांना विनंती करण्यात येते की, आपल्या जिल्ह्याशी संबंधित ब्रिफ डॉक्युमेंट बाबत पाणथळ जागा (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ नुसार स्वयंस्पष्ट अभिप्राय सदर ब्रीफ डॉक्यूमेंट प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत यासोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद करून राज्य वेटलँड प्राधिकरणास सादर करण्यात यावेत, ही विनंती. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर यांचे आदेश पाहता सदर प्रकरणी मुदतीत अभिप्राय उपलब्ध करून देण्यात यावेत, ही विनंती.

सदर पत्र सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(निलेश पोतदार)
अवर सचिव तथा शा.श्रे. २
महाराष्ट्र शासन

**सोबत** – वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव :-**

१. सदस्य सचिव, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, गोंदिया.
२. सदस्य सचिव, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, भंडारा.
३. सदस्य सचिव, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, चंद्रपूर.
४. सदस्य सचिव, जिल्हा वेटलँड सनियंत्रण समिती, नागपूर.

**प्रत माहितीस्तव**

१. मा. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल) तथा सदस्य सचिव, राज्य वेटलँड प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई – ०३२.